-: प्रेसनोट दिनांक - ०६/११/२०२५ :-

आरोपी लोकसेवक ०१) गणेश विष्णुपंत सोनवणे, वय - ३२ वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. रामचंद्र जाधव त्यांचे घरी भाडयाने जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर, मुळ गाव वणी, ता.दिडोंरी जि.नाशीक, ०२) नेताजी केशव पाटील, वय - ४५ वर्षे, पद- कोतवाल, सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, रा. शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत.......

---

यातील मुळ तक्रारदार यांचे वडीलांनी इचलकरंजी, ता. हातकणंगले येथे खरेदी केले क्षेत्रास खरेदीनंतर तक्रारदार यांचे वडीलांचे नाव फेरफार होवुन सात बारा पत्रकी लावुन देणेकरीता ०१) गणेश विष्णुपंत सोनवणे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर ०२) नेताजी केशव पाटील, वय - ४५ वर्षे, पद- कोतवाल, सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, यांनी २५,०००/- रूपये द्यावे लागतील असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. म्हणुन तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे तक्रार दिली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये मुळ तक्रारदार यांचे वडील यांचे नाव इचलकरंजी येथील खरेदी केलेल्या क्षेत्रास खरेदीनंतर फेरफार होवुन ७/१२ पत्रकी नोंद करणेकरीता, तक्रारदार यांचेकडे तलाठी सोनवणे यांनी स्वत:साठी २०,०००/- रूपये बेकायदेशिरपणे लाचेची मागणी करून मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी १०,०००/- लाच रक्कम कोतवाल पाटील यांचेकडे देणेस सांगितले. तसेच कोतवाल पाटील यांनी तक्रारदार यांना हाताने पैशाचा इशारा करत (हाताचे बोटावरून अंगठा वर उडवत) "हेज काय" असे म्हणुन लाच मागणी करून रक्कम "घेवुन येजा की " असे म्हणुन बेकायदेशिरप पणे लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांना आरोपी कमांक ०१ व ०२ **यांनी बोलावुन घेवुन ते दोघे समवेत असताना तलाठी सोनवणे व कोतवाल पाटील यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेतील १०,०००/- रूपये लाच रक्कम** तलाठी सोनवणे यांनी तक्रारदार यांचेकडुन स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदरबाबत आरोपी लोकसेवक ०१) गणेश विष्णुपंत सोनवणे, वय - ३२ वर्षे, पद - ग्राम महसुल अधिकारी (तलाठी), सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर सद्या रा. रामचंद्र जाधव त्यांचे घरी भाडयाने जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि.कोल्हापूर, मुळ गाव वणी, ता. दिडोंरी जि.नाशीक, ०२) नेताजी केशव पाटील, वय - ४५ वर्षे, पद- कोतवाल, सजा शहापूर, इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर, रा. शहापुर, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे, इचलकरंजी, जि. कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकीया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. अर्जुन भोसले, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्री राजेंद्र सानप पोलीस निरीक्षक, पो.ना.सुधिर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील, पो.कॉ.प्रकाश चौगले, चा.स.पो.फौ. गजानन कुराडे अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.

१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.

३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर
मो.नं. ९७६४१४०७७७. ९४०४३२१०६४ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.